
UGC Approved Sr. No. 49366

SRJIS

ISSN -2278-8808

GLOBALLY INDEXED
IMPACT FACTOR
SJIF 2016
6.177




An International
Peer Reviewed

Referred
Quarterly

# SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

JAN - FEB , 2018. VOL. 5, ISSUE -46

EDITOR IN CHIEF : YASHPAL D. NETRAGAONKAR, Ph.D.

## MARATHI PAPER


| | | |
|---|---|---|
| 20 | मुदित शोधनातील रोजगार संधी<br>*प्रा. डॉ. जगदीश आवटे* | 69-72 |
| 21 | **प्रसार माध्यमे आणि नोकरीच्या संधी**<br>*प्रा. डॉ. निवृत्ती मिसाळ* | 73-74 |
| 22 | व्यावहारिक मराठी आणि आधुनिक प्रसारमाध्यमांचे स्वरूप<br>*प्रा . डॉ . निलेश खरात* | 75-77 |
| 23 | प्रसारमाध्यमे आणि नोकरीच्या संधी<br>*प्रा . मधुकर वैकरे* | 78-81 |
| 24 | मराठी भाषा व नोकरीच्या संधी<br>*प्रा. डॉ. वसंत दामोधर सपकाळ* | 82-83 |
| 25 | भाषा,साहित्य आणि व्यावसायिक संधी<br>***डॉ .कार्तिकी विजयकुमार नांगरे*** | 84-86 |

ISSN: 2278-8808

# प्रसार माध्यमे आणिनोकरीच्या संधी

**प्रा. डॉ. निवृत्ती मिसाळ**
मराठी विभाग प्रमुख कला, वाणिज्य वविज्ञान महाविदयालय सोनई

प्रसार माध्यमाने आधुनिक युगात वेगवेगळया नोक-या मिळवून दिल्या. प्रसार माध्यमे नेमके कोणते माध्यम, अकाशवाणी दुरदर्शनवृत्तपत्र हे प्रभावी प्रसार माध्यमे आहे. आकाशवाणीजनसंपर्काचे प्रभावी माध्यम आहे. अकाशवाणीहे प्रत्येकाच्या घरापर्यंत जाऊन पोहचलेले स्वस्तव सुलभ माध्यम आहे. कोणतीही माहिती श्रोत्यापर्यंत पोहचविण्याचे अतिशय शीघ्र माध्यम आहे. ते श्राव्य माध्यम आहे. समाजातील निरक्षर समुहापर्यंत ते जाऊन पोहचले. सुशिक्षित अशिक्षितगरीब श्रीमंत वर्गापर्यंत ते सहजपणे पोहचत असल्यामुळे ते प्रभावी माध्यम आहे. समाजातील वेगवेगळया घटनासांस्कृतिक, सामाजिक, धार्मिक, भावनिक, विशेष मनोरंजन, शिक्षण इ. विषयाची माहिती श्रोत्यांना देवून समाजजीवनात सजीवता आणणारेहे माध्यम आहे. या माध्यमामाध्ये अनेक नोक-यांच्या संधी आहेत. निवेदक, या माध्यमासाठी वेगवेगळया नाटीका यासाठी लिखाण करणे जाहिरातीसाठीलिखान, उत्कृष्ठ संयोजक म्हणूनही. नोकरी मिळू शकते. ज्या व्यक्तिचा आवाजचांगला असेल तर उत्कृष्ठ नभोनाटय करुशकतात, अनेक अनेकसंधी अकाशवाणीवर उपलब्ध असतात.

## दुरदर्शन

दुरदर्शन या माध्यमाद्वारेसुध्दा अनेक नोकरीच्या संधी मिळू शकतेहे माध्यम दृकश्राव्य आहे. या यंत्राधितील माध्यमाद्वारे संवाद साधण्यासाठी अनेक माणसांची गरजलागते. व्यक्तिच्या मनातला आशय प्रेक्षकापर्यंत पोहचविणारे ते एक प्रभावी प्रसार माध्यम आहे. दुरदर्शनहे लोकप्रिय प्रसारमाध्यम आहे. प्रसारमाध्यमात १८८४ सालीच दुरदर्शनचा प्रयोग पहिल्यांदा केलागेला. भारताआधी अमेरिका, फ्रान्स, रशिया या देशांनी दुरदर्शनचा वापर केला. युनेस्कोचा तांत्रिक आणि आर्थिक सहाय्यामुळे भारताने दुरदर्शनचे कार्यक्रम सुरु केले. १९६५ मध्ये एका तासापुरते नियमित कार्यक्रम दाखविले जाऊलागले १९७६ सालीदुरदर्शन प्रसारण केंद्राची स्थापना झाली. १९७६ पासून आजपर्यंन्त भारताच्या सर्व खेडयापाडयात दुरदर्शन जाऊन पोहचले.

टेलिव्हिजनTelevision हाग्रीकलॅटिन शब्द आहे. दुरदर्शनहा मराठी शब्द होय. Tele म्हणजे दुरव Vision म्हणजे पाहणे. ध्वनीसहचित्रदर्शन करणारेहे माध्यम आहे. महानिर्देशक यांच्या अधिपत्याखाली हे माध्यम काम करणे.

राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक परिवर्तन, विज्ञान प्रेरणा कुटुंब कल्याण शेती विकासात्मक माहिती पर्यावरण माहिती महिला-मुले व आदिवासीविकासाचा प्रयत्न विविधखेळांचे प्रक्षेपण व माहिती, सांस्कृतिकता इत्यादी.

## कार्यक्रम निर्मिती विभाग :-

दुरदर्शनहे दृश्य व श्राव्यात्मक प्रसारमाध्यम असल्याने त्यावरील कार्यक्रमांची निर्मिती सावधानपुर्वक करावीलागते. बाताम्यावरील इतरहीविविध प्रकारचे कार्यक्रम उदा. मालिका , विविध प्रायोगिक कार्यक्रम, चित्रपट माहितीपट, लघुपट, शेतीविषयक कार्यक्रम गीतींचे कार्यक्रम, विज्ञान-विषयक कार्यक्रम, अंतराळ,

माहितीवर आधारित कार्यक्रम इ. कार्यक्रम सादरहोतात. या सर्वात महत्वाची ठरते ती भाषा दुरदर्शनहे माध्यम मनोरंजन आणि प्रबोधन हेच मुख्य उददेश असतात. बातम्या चित्रपट, चित्रपट गीतेव छायागीत गीतांचाविशेष कार्यक्रम, मुलाखती जागतिक, विविधखेळांचे प्रक्षेपण, जाहिराती, वृत्तांकन, नाटक, आरोग्यविषयक कार्यक्रम, निवडणुकांचेविश्लेषण, कलाकारांच्या कलाविषयक कार्यक्रम इ. अनेक कार्यक्रम सादर केले जातात.

अशा या कार्यक्रम निर्मिती विभागामध्ये वेगवेगळया प्रकारच्या बातम्या शोधन उपेक्षित घटकांवरव खरेपणाच्या बातम्या दुरदर्शनात त्या पटवून देवून त्या ठिकाणीरोजगाराचीसंधी मिळू शकते. मालिकाचे सुध्द लेखन करुन दुरदर्शवरुन त्या मालिकाचे लिखान विभागामध्ये रोजगाराचीसंधी मिळू शकते. चांगल्या चित्रपटाची निर्मिती करणे, माहितीपट, लघुपट, शेतीविषयक कार्यक्रम, गीतांचे कार्यक्रमासाठी लिखानाची आवश्यकता दुरदर्शनची आवश्यकता असते. चांगल्या निवेदनाचीगरज असते. चांगली मुलाखत घेणा-याची गरज असते असे उपक्रमासाठी चांगल्या व्यक्तिची गरज भासते. चांगल्या जाहिरातीलिखानाची आवश्यकता अशाविविध प्रकारासाठी नोकरीच्या संधी प्राप्त होऊशकतात.

**वर्तमानपत्र**

वर्तमानपत्र हे प्रसार माध्यमाचे महत्वाचा भाग आहे. स्वातंत्र्य काळातही केसरी, मराठा, नवा काळ इ. वर्तमानपत्रे प्रसिध्द होत असत. वर्तमान पत्रामध्ये अनेकविविध प्रकारच्या चौफेर बातम्या असतात. क्रिडाविषयक, शेतीविषयक, सामाजिक, राजकिय, अध्यात्मिक, क्षेत्रातील बातम्या असतात. छोटया जाहिराती भरपूर माहिति वृत्तपत्रात समाविष्ट केलेली असते. संपादन विभागाचे ताज्या बातम्या देणे. हे काम असले तरीविशिष्ट गोष्टींवर प्रकाश टाकण्याचे कामही वर्तमानपत्र करते.

संपादन, सहसंपादक मुख्य संपादक,हेवृत्तपत्राचेस्तर असतात. सहसंपादकविशेषकिंवारविवार आवृत्तीचे काम पाहतो. बातमी लेखनहा वर्तमानत्राचा प्राण आहे. देशभरात घडणा-या विविधघटनांचावेधघेवून बातमी तयार केली जाते. पहिल्या पानावर अत्यंत महत्वाच्या बातम्यांना स्थानदिले जाते. पान पाहून वर्तमानपत्र विकतघेणारेवाचकहीदिसतात.

वर्तमानत्रासाठी चांगलासदरलेखकहीहवा असतो. याठिकाणी सुध्दा रोजगार मिळू शकतो''इर्जिक ''''कवडस'' लिहीणारेलेखकहीहवे असते. येथेहीराजकाराचीसंधी मिळू शकते. चांगल्या संपादक उपसंपादकाचीगरज असते. रविवार पुरविणी आवृत्तीचे काम पाहणारे वृत्तपत्राला नोकरदारहवा असतो. येथेही नोकरीचीसंधी मिळू शकते. बातमी लेखनासाठीच्या वार्ताहाराचीगरज असते. चांगल्या छाया चित्रकाराचीगरज असते. कृषी विषयक माहिती सामाजिक, राजकिय, आध्यात्मिक क्षेत्रातील बातमीची गरज वर्तमानत्राला असते येथेही रोजगार मिळू शकतो. चांगल्या मृदितशोधकाचीगरज असते. हस्ताक्षरातीलहा मजकूर संगणकावर टाईप केला जातो. असा मजकूर चुकूशकतो अशावेळेसचुकाशोधून काढण्यासाठी मुद्रित शोधकाची महत्वाची भुमिका असते. येथेही रोजगारकिंवा नोकरी मिळू शकतो.

**संदर्भ सुची :-**

*व्यावहारिक व उपयोजित मराठी, प्रा. डॉ. चं.वि.जोशी*
*ल.रा. नसिराबादकर व्यावहारिक मराठी*
*धायगुडे य.ए. मुद्रित शोधन भाग-१*
*व्यावहारिक मराठी संपा. य.प्र. कुलकर्णी*